राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण)

**राज्यस्तरीय सुकाणू समिती**

**बैठक क्र.५ व ६**

**दिनांक- २६/०८/२०२४ व दिनांक. ०९/०९/२०२४ स्थळ- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई**

---

## बैठकीचे इतिवृत्त

---

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार ५+३+४ आकृतीबंधातील शिक्षणाचे बालपणातील काळजी व शिक्षण (पायाभूत स्तर) शालेय शिक्षण, शिक्षक शिक्षण व प्रौढ शिक्षण मधील घटकांचे अवलोकन करून राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गुणवत्तापूर्ण व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय दि.२४/०५/२०२३ अन्वये मा. मंत्री शालेय शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आलेली आहे (३२ सदस्य) आणि शासन निर्णय दि.०२/०१/२०२४ अन्वये सदर समितीमध्ये ०३ नवीन सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) मंजुरीचे अनुषंगाने राज्यस्तरीय सुकाणू समितीची बैठक दिनांक- २६/०८/२०२४ रोजी दुपारी- १२:३० वा. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये सर्व विषयांवर पूर्ण चर्चा होऊ न शकल्याने सदर समितीची बैठक पुनश्च त्याच ठिकाणी दिनांक- ०९/०९/२०२४ रोजी दुपारी- ०२:००वा. आयोजित करण्यात आली. सदस्यांना ऑनलाईन VC च्या माध्यमातूनही उपस्थित राहण्याचीही सुविधा देण्यात आली होती.

**सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते. (Hybrid Mode)**

| क्र. | समिती सदस्यांचे नाव | पद | उपस्थिती-५ (२६/०८/२४) | उपस्थिती-६ (०९/०९/२४) |
|---|---|---|---|---|
| १ | मा. दिपक केसरकर, मंत्री, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष | ऑनलाईन | प्रत्यक्ष |
| २ | श्रीमती आय. ए. कुंदन, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई. | सह अध्यक्ष | *** | प्रत्यक्ष |
| २ | श्री. सूरज मांढरे, आयुक्त )शिक्षण(, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य | ऑनलाईन | प्रत्यक्ष |
| ३ | आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांचे प्रतिनिधी श्री अविनाश चव्हाण | सदस्य | प्रत्यक्ष | *** |
| ४ | श्री. कैलास पगारे आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना कार्यालय, बेलापूर, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री नागरगोजे | सदस्य | *** | प्रत्यक्ष |
| ५ | श्री. ओमप्रकाश बकोरिया आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, पुणे | सदस्य | ऑनलाईन | *** |
| ६ | श्री. राहूल रेखावार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे | सदस्य सचिव | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ७ | श्री. महेश पालकर, शिक्षण संचालक (योजना) महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे प्रतिनिधी श्रीमती अनिता कडू | सदस्य | प्रत्यक्ष | ऑनलाईन |
| ८ | श्री. संपत सूर्यवंशी, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | प्रत्यक्ष | *** |
| ९ | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्यमंडळ), पुणे यांचे प्रतिनिधी श्रीमती अनुराधा ओक, सचिव | सदस्य | ऑनलाईन | प्रत्यक्ष |
| १० | श्री. शरद गोसावी, शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| ११ | श्री. शरद गोसावी, शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे प्रतिनिधी श्री देविदास कुलाळ, उपसंचालक | | *** | प्रत्यक्ष |
| १२ | श्री. कृष्णकुमार पाटील, संचालक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती) पुणे. | सदस्य | ऑनलाईन | प्रत्यक्ष |
| १३ | डॉ. दिपक म्हैसेकर, सेवानिवृत्त भा.प्र.से. | सदस्य | ऑनलाईन | *** |
| १४ | श्री. सुहास रघुनाथ पेडणेकर, माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| १५ | श्री. मिलिंद नाईक, प्राचार्य, ज्ञानप्रबोधिनी, पुणे. | सदस्य | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| १६ | श्री. शेषाद्री व्यंकटेश डांगे, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| १७ | श्री. रमेश देविदास देशपांडे, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | श्री. महेश गंगाधर कळलावे, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| १९ | डॉ. मधुश्री संजीव सावजी, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २० | डॉ. अजय दिगंबर महाजन, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २१ | डॉ. अशोक भोसले, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २२ | श्री. श्रीपाद मधुराकांत ढेकणे, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २३ | श्री. नारायण वासुदेव मराठे, शिक्षण तज्ज्ञ | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २४ | श्री. अंकेश ललितप्रसाद शाहू, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २५ | श्रीमती शोभना प्रकाश भिडे, शिक्षण तज्ज्ञ. | सदस्य | प्रत्यक्ष | ऑनलाईन |
| २६ | श्री. भरत सडकगावडे, सेवानिवृत्त शिक्षक. | सदस्य | ऑनलाईन | *** |
| २७ | डॉ. नेहा जगतियानी, प्राचार्य, नॅशलन कॉलेज, मुंबई | सदस्य | *** | प्रत्यक्ष |
| २८ | श्री. अशोक हरिभाऊ मुंडे, सेवानिवृत्त अति .जिल्हाधिकारी | सदस्य | ऑनलाईन | ऑनलाईन |
| २९ | श्री. तुषार वसंत महाजन, उपसचिव, मंत्रालय, मुंबई | | *** | प्रत्यक्ष |
| ३० | डॉ. शोभा खंदारे, सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | *** |
| ३१ | डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३२ | डॉ. नेहा बेलसरे, उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | *** |
| ३३ | श्री. राजेंद्र वाकडे, वरिष्ठ अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३४ | श्रीमती वर्षाराणी भोपळे, वरिष्ठ अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३५ | श्रीमती तेजस्विनी आळवेकर, वरिष्ठ अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३६ | श्रीमती मनिषा यादव, वरिष्ठ अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३७ | डॉ. अजयकुमार फुंदे, अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३८ | श्रीमती दिपाली जोगदंडे, अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ३९ | श्रीमती वृषाली गायकवाड, अधिव्याख्याता, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
| ४० | श्री. अशोक पानसरे, विषय सहायक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. | | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |

बैठकीच्या सुरुवातीस डॉ. कमलादेवी आवटे, उपसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी उपस्थित मान्यवर सदस्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले, परिषदेमार्फत राबविण्यात आलेली राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) निर्मिती प्रक्रिया विषद केली तसेच त्यावर आलेल्या जनतेच्या प्रतिक्रिया व अभिप्रायांबाबत स्थिती सादर केली. त्यानंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

**१. मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून कायम करणे.**

मागील सभा दि.१४/०३/२०२४ रोजीचे बैठकीचे इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यास मान्यता देण्यात आली.

**२. राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण (SCF-SE) चे सादरीकरण व मसुद्यास मान्यता देणे.**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या व राज्यस्तरीय सुकाणू समिती सदस्यांस दिलेल्या राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) मसूद्याचे प्रकरण निहाय सादरीकरण करण्यात आले. त्यानुसार बाबनिहाय चर्चा झाली. ज्या बाबींमध्ये बदल सुचविण्यात आले, त्या बाबी पुढीलप्रमाणे-

| मूळ मसुद्यामधील मजकूर (स्तंभ.१) | सुकाणू समितीने मान्य केलेला मजकूर (स्तंभ.२) |
|---|---|
| **भाग-अ दृष्टीकोन (Approach)**<br>**मुद्दा- ३.४.१२.२ ब ४ सत्र पद्धतीनुसार मूल्यमापन-** | **भाग-अ मुद्दा- ३.४.१२.२**<br>**मूळ मजकूर खालीप्रमाणे बदलण्यात यावा-**<br>• मुद्दा- ३.४.१२.२ (ब) उपमुद्दा (३) पुढीलप्रमाणे बदलावा-<br>इयत्ता १०वी व १२वी साठी सत्र पद्धतीबाबत विचार-<br>इ.१०वी व १२वी साठी प्रथम सत्राच्या परीक्षा सुयोग्य नियोजनाने (उदा. पुस्तकासहित, वस्तुनिष्ठ स्वरुपाचे व OMR Sheet द्वारे) मंडळामार्फत घेण्याचा विचारही भविष्यात करता येईल. ज्याद्वारे अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये अनेक फायदे घेता येतील.<br>• मुद्दा- ३.४.१२.२ (ब) उपमुद्दा (४) वगळावा.<br>• मुद्दा- ३.४.१२.२ (ग) मधील परिच्छेद क्र.२ "इयत्ता दहावी व - - - - - - - बोर्डाद्वारे घेण्यात यावे" वगळावा. |
| **भाग- अ दृष्टीकोन, मुद्दा क्र. ३.४.१२.२ (फ) २**<br>मंडळाने याबाबत ३५ पेक्षा कमी गुण असणारे असे किमान गुण दोन्ही विषयनिहाय ठरवावेत आणि या किमान गुणांपेक्षा अधिक परंतु ३५ पेक्षा कमी गुण (गणित व विज्ञान यांपैकी एका अथवा दोन्ही विषयात) प्राप्त असतील तर, अशा विद्यार्थ्यास गुणपत्रिकेवर पुढील आशयाचा शेरा नमूद करून उत्तीर्ण करण्यात यावे. | **मुद्दा क्र. ३.४.१२.२ (फ) २**<br>**येथील मजकूर पुढीलप्रमाणे बदलण्यात यावा -**<br>विद्यार्थ्यास किमान २० गुणांपेक्षा अधिक परंतु ३५ पेक्षा कमी गुण (गणित व विज्ञान यांपैकी एका अथवा दोन्ही विषयात) प्राप्त असतील तर, अशा विद्यार्थ्यास गुणपत्रिकेवर पुढील आशयाचा शेरा नमूद करून उत्तीर्ण करण्यात यावे. |
| **भाग-अ, प्रकरण -४ वेळेचे नियोजन**<br>**मुद्दा क्र. ४.२.२ (ब)** | **मुद्दा क्र. ४.२.२ (ब) हा मुद्दा पूर्णपणे वगळण्यात येत आहे. त्याऐवजी, पुढील मजकूर समाविष्ट करावा-**<br>CBSE मंडळाचा अभ्यासक्रम बहुतांश स्वीकारण्यात येत असल्याने शाळांचे वार्षिक वेळापत्रकही CBSE मंडळाप्रमाणे ठेवण्यात येईल. |
| **भाग-अ, प्रकरण -४ वेळेचे नियोजन**<br>**४.३.४ दोन सत्रात भरणाऱ्या शाळांच्या वेळापत्रकाचे नियोजन** | **४.३.४ मध्ये पुढील वाक्य (ब) म्हणून जोडावे.**<br>ब) ज्या शाळा दोन्ही सत्रांमध्ये भरतात त्यांनी मोठ्या विद्यार्थ्यांचे वर्ग सकाळच्या सत्रात व लहान विद्यार्थ्यांचे वर्ग दुपारच्या सत्रात भरविण्याचा प्रयत्न करावा. |
| **भाग- ब आंतरसमवाय क्षेत्रे ४.४-**<br>**विशेष प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी सराव.**<br>४.४ (अ) अभिमत / स्वायत्त विद्यापीठाच्या धर्तीवर अभिमत/स्वायत्त शाळांचीसुद्धा संकल्पना योग्य अटी व शर्तीच्या अधीन राहून आवश्यक त्या कायद्यामध्ये दुरूस्ती करून इयत्ता ६ वी पासून राबविण्याबाबत विचार करण्यात यावा. | **मुद्दा ४.४ (अ) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात यावा.**<br>अभिमत/स्वायत्त विद्यापीठाच्या धर्तीवर शाळांचीसुद्धा संकल्पना योग्य अटी व शर्तीच्या अधीन राहून आवश्यक ते कायद्यामध्ये दुरूस्ती करून इयत्ता ६ वी पासून राबविण्याबाबत विचार करण्यात यावा. शाळेने स्वतःच्या अभ्यासक्रमाला शासनाची मान्यता घेऊन शिकवावे तसेच शाळांमध्ये अनेक विषयांचे स्वातंत्र्य ठेवता येईल. |
| **भाग-ब, मद्दा ४.४ (इ)**<br>सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक दिली पाहिजे जेणेकरून विशेष प्रतिभा असलेल्या मुलांमध्ये अहंगंड व सामान्य मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होणार नाही. | **मद्दा ४.४ (इ) मध्ये पुढील वाक्य जोडण्यात यावे.**<br>यादृष्टीने स्वयंअर्थसहाय्यित शाळांमध्ये RTE अंतर्गत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या समावेशनासाठी सदरील बाब कटाक्षाने पाळण्यात यावी. |
| **भाग- क, प्रकरण-१ भाषा शिक्षण**<br>**१.४ अध्ययनाची मानके,** | **आराखड्यामध्ये मध्ये पुढील वाक्ये समाविष्ट करावीत,**<br>○ सर्व माध्यमांना भाषांचे पाठ्यक्रम R१, R२, R३ साठी समान पातळीचे करण्याचा प्रयत्न करावा.<br>○ मराठी व इंग्रजी माध्यमासाठी भाषा-३ (R३) म्हणून हिंदी भाषा विषय इ.१ली पासून सुरु करावा. यादृष्टीने, राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) SCF-SE मध्ये तसेच, राज्य |

| | |
|---|---|
| | अभ्यासक्रम आराखडा (पायाभूत स्तर) SCF-FS मध्येही लागू असलेल्या सर्व ठिकाणी आवश्यक बदल करण्यात यावेत. |
| **भाग-क, शालेय विषय, मुद्दा क्र. १.४**<br>**परकीय भाषा** - जसे की,<br>इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, जापनीज, स्पॅनिश, चायनीज, पर्शियन, अरेबिक, प्रगत इंग्रजी | **मुद्दा क्र. १.४ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करावा.**<br>परकीय भाषांमध्ये हिब्रु भाषेचाही समावेश करावा. |
| **भाग-क, मुद्दा क्र. ९.१ विषययोजना,**<br>परकीय भाषा (०९)<br>इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन, जापनीज, स्पॅनिश, चायनीज, पर्शियन, अरेबिक, प्रगत इंग्रजी | **मुद्दा क्र. ९.१ मध्ये पुढीलप्रमाणे बदल करावा.**<br>परकीय भाषांमध्ये हिब्रु भाषेचाही समावेश करावा. |
| **भाग-क, शालेय विषय, मुद्दा क्र. १.४**<br>**अध्ययन मानके** (शेवटचा परिच्छेद) (पृष्ठ क्र.१६१)<br><br>इयत्ता सहावी ते दहावीसाठी भाषा-३ (R३) परकीय भाषा (इंग्रजी वगळता) केवळ ५० गुणांसाठीच (संयुक्त) असेल, १०० गुणांसाठी असणार नाही.<br><br>परकीय भाषांचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य बनवताना तसेच त्यांच्या मूल्यमापनासाठी CEFR (Common European Framework of Reference for language) चा आधार घेऊन इयत्ता दहावी अखेरीस A१ व A२ प्रमाणपत्राचा दर्जा आणि इयत्ता अकरावीच्या अखेरीस B१ प्रमाणपत्राचा दर्जा व इयत्ता बारावी अखेरीस B२ प्रमाणपत्राचा दर्जा प्राप्त होईल याची दक्षता घेण्यात येईल. | **मुद्दा १.४ येथील परिच्छेद पुढीलप्रमाणे बदलावा.**<br>ज) परकीय भाषा शिक्षण-<br>* इ.६वी ते १०वी साठी भाषा-३ (R३) परकीय भाषा पाठ्यक्रम (इंग्रजी वगळता) केवळ ५० गुणांसाठीच (संयुक्त स्वरुपातील) असेल, १०० गुणांचा असणार नाही. इ.११वी, १२वी साठी परकीय भाषा पाठ्यक्रम १०० गुणांचा असेल, ५० गुणांसाठी असणार नाही.<br>* परकीय भाषांचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य बनवताना तसेच त्यांच्या मूल्यमापनासाठी CEFR (Common European Framework of Reference for language) चा आधार घेऊन इयत्ता सहावी ते आठवीसाठी A१, A२, इयत्ता नववी अखेरीस B१, दहावी अखेरीस B२ इ.११वी अखेरीस C१ आणि इ. १२वी अखेरीस C२ प्रमाणपत्राचा दर्जा प्राप्त होईल अशा पद्धतीने पाठ्यक्रम बनविण्याचा प्रयत्न करावा.<br>* इ.११वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर परकीय भाषा (इंग्रजी व्यतिरिक्त) प्रथमच घ्यावयाची असेल तर त्यांच्यासाठी इ.११वी, १२वी साठी स्वतंत्र पाठ्यपुस्तके बनविण्यात यावीत आणि इ.१२वी अखेर त्यांना किमान A२ दर्जा प्राप्त होईल असा प्रयत्न करावा. |
| **भाग-क, मुद्दा क्र. ९.१ (उपमुद्दा क्र.७)**<br>**प्रस्तावित विषययोजनेबाबत सर्वसाधारण बाबी, (पृष्ठ क्र.३३३)**<br>इयत्ता सहावी पासून परकीय भाषा केवळ ५० गुणांचेच पाठ्यक्रम चालविण्यात येतील. | **मुद्दा क्र. ९.१ (उपमुद्दा.७) येथील वाक्य पुढीलप्रमाणे बदलावे.**<br>* इ.६वी ते १०वी साठी भाषा-३ (R३) परकीय भाषा पाठ्यक्रम (इंग्रजी वगळता) केवळ ५० गुणांसाठीच (संयुक्त स्वरुपातील) असेल, १०० गुणांचा असणार नाही. इ.११वी, १२वी साठी परकीय भाषा पाठ्यक्रम १०० गुणांचा असेल, ५० गुणांसाठी असणार नाही. |
| **भाग-क, मुद्दा क्र. ९.३ टीप-२**<br>**प्रस्तावित विषययोजना, (पृष्ठ क्र.३३५)**<br>इयत्ता सहावी ते दहावीसाठी भाषा-३ (R३) परकीय भाषा (इंग्रजी वगळता) केवळ ५० गुणांसाठीच (संयुक्त) असेल, १०० गुणांसाठी असणार नाही.<br>परकीय भाषांचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य बनवताना तसेच त्यांच्या मूल्यमापनासाठी CEFR (Common European Framework of Reference for language) चा आधार घेऊन इयत्ता दहावी अखेरीस A१ व A२ प्रमाणपत्राचा दर्जा आणि इयत्ता अकरावीच्या अखेरीस B१ प्रमाणपत्राचा दर्जा व इयत्ता बारावी अखेरीस B२ प्रमाणपत्राचा दर्जा प्राप्त होईल याची दक्षता घेण्यात येईल. | **मुद्दा क्र. ९.३ टीप-२ येथील परिच्छेद पुढीलप्रमाणे बदलावा.**<br>* परकीय भाषांचा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यसाहित्य बनवताना तसेच त्यांच्या मूल्यमापनासाठी CEFR (Common European Framework of Reference for language) चा आधार घेऊन इयत्ता सहावी ते आठवीसाठी A१, A२, इयत्ता नववी अखेरीस B१, दहावी अखेरीस B२ इ.११वी अखेरीस C१ आणि इ. १२वी अखेरीस C२ प्रमाणपत्राचा दर्जा प्राप्त होईल अशा पद्धतीने पाठ्यक्रम बनविण्याचा प्रयत्न करावा.<br>* इ.११वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जर परकीय भाषा (इंग्रजी व्यतिरिक्त) प्रथमच घ्यावयाची असेल तर त्यांच्यासाठी इ.११वी, १२वी साठी स्वतंत्र पाठ्यपुस्तके बनविण्यात यावीत आणि इ.१२वी अखेर त्यांना किमान A२ दर्जा प्राप्त होईल असा प्रयत्न करावा. |
| **भाग-क, शालेय विषय, मुद्दा क्र. १.४**<br>**अध्ययन मानके** | **मुद्दा क्र. १.४ ज. मध्ये पुढील वाक्ये जोडावीत-**<br>○ इ.१२वी पर्यंतचा परकीय भाषा अभ्यासक्रम प्रमाणबद्ध |

| | |
|---|---|
| (शेवटचा परिच्छेद) (पृष्ठ क्र.१६१) | करण्यासाठी परदेशातील विविध विद्यापीठांसोबत / सक्षम संस्थांसोबत सामंजस्य करार (MOU) करण्यात यावेत व त्यांचे सहकार्य घ्यावे.<br>○ विविध भाषा शिकण्यासाठी मराठीतून त्या भाषा शिकता येतील या स्वरुपाची पुस्तके बनविण्यात यावीत. |
| **भाग-क, शालेय विषय, प्रकरण-९ विषययोजना- मुद्दा क्र.९.१**<br>**प्रस्तावित विषययोजना सर्वसाधारण बाबी.** | **मुद्दा ९.१ मध्ये पुढील मुद्दे जोडावेत.**<br>○ इयत्ता १ ली पासून कृषी विषय अभ्यासक्रमात प्रभावीपणे समाविष्ट करावा .<br>○ कब-बुलबुल / स्काऊट आणि गाईड हा विषय आनंददायी शनिवार उपक्रमामध्ये बंधनकारकरित्या समाविष्ट करावा.<br>○ इयत्ता ११वी व १२वी प्रस्तावित विषय योजना व उच्च शिक्षणातील सर्व अभ्यासक्रमांची पात्रता यांचा समन्वय साधण्यात यावा व यासाठीचा तक्ता सर्वांना उपलब्ध करून देण्यात यावा.<br>○ उच्च शिक्षणात काही अभ्यासक्रमांसाठी इंग्रजी विषय अनिवार्य असल्यास तशी उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून खात्री करुन घ्यावी. त्यानुसार विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. |
| **भाग-क, शालेय विषय, प्रकरण-९ विषययोजना- मुद्दा ९.४ विषययोजनेतील ठळक बाबी**<br>१.उच्च शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या देश पातळीवरील प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांना सुलभ व्हावी यासाठी, विज्ञान, गणित, इंग्रजी, हिंदी, व्यावसायिक शिक्षण यांसारख्या विषयांची पाठ्यक्रम / पाठ्यपुस्तके NCERT ची (महाराष्ट्र राज्याशी समर्पक चित्रे, उदाहरणे समाविष्ट करून) जशीच्या तशी स्वीकारण्यात येतील.<br>मराठी, इतिहास, भूगोल यांसारख्या राज्य विशिष्ट विषयांबाबत पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके राज्याने तयार करावीत. तसेच NCERT कडील पाठ्यपुस्तकांना पूरक साहित्य, हस्तपुस्तिका इ. निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत करण्यात यावी. | **स्तंभ.१ मधील मुद्द्यांमध्ये पुढील मुद्दे जोडावेत.**<br>○ इतिहास, भूगोल सारख्या विषयांचा पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके तयार करताना आशयाचे प्रमाण स्थानिक, राज्य, राष्ट्रीय, जागतिक नुसार ठरविण्यात यावे.<br>○ अन्य भाषांसाठी पाठ्यपुस्तके NCERT / CBSE अथवा संबंधित राज्यांकडून घेऊन स्वीकारता येतील.<br>○ मराठी भाषेसाठी पाठ्यपुस्तके राज्याने तयार करावीत.<br>○ NCERT / CBSE कडील पाठ्यपुस्तके इंग्रजी व हिंदी माध्यमांमध्ये उपलब्ध आहेत. अन्य माध्यमांसाठी सदर पाठ्यपुस्तकांचे भाषांतर करुन ती पाठ्यपुस्तके आवश्यक माध्यमांत उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी बालभारतीची असेल. |
| **भाग-इ, मुद्दा क्र. ३.९**<br>**स्थानिक बोलीभाषेवर प्रभुत्व असणारे तसेच बहुभाषिक शिक्षक नियुक्ती** | **मुद्दा क्र. ३.९ मध्ये पुढील आशय समाविष्ट करावा.**<br>○ दूरस्थ भागामध्ये स्थानिक भाषा व प्रमाण भाषा यांमध्ये खूप तफावत असल्याने शिक्षणात अडथळे येत असलेचे दिसून येते. तसेच एकाच वर्गात विविध बोली भाषा असलेले विद्यार्थी असतात त्यामुळे शिक्षकांना त्यांचेशी संवाद साधताना अडचणी येतात. सबब<br>○ शाळाव्यवस्थापन समितीने मागणी केल्यास स्थानिक बोली भाषा जाणणारे शिक्षक गरजेनुसार इ.२ री पर्यंतच्या इयत्तांसाठी नियुक्त करणेबाबत विचार करण्यात येईल.<br>○ शिक्षक भरती प्रक्रियेमध्ये अशा स्थानिक तसेच बहुभाषिक शिक्षकांच्या भरतीसाठी प्राधान्य देण्याची व्यवस्था करता येईल. |

**३. भाग-क, शालेय विषय, प्रकरण-९ विषययोजना (इ.११वी, १२वी) मुद्दा क्र.९.९ बाबत सुधारणा -**

मुद्दा क्र.९.९ येथील प्रस्तावित विषययोजना इ.११वी, १२वी तक्त्यामध्ये समितीने सुधारणा सुचविल्या, त्यानुसार SCF-SE मसुदा पृष्ठ क्र.३४४ वरील तक्ता सुधारित करण्यात यावा.

**मुद्दा क्र. ९.९ प्रस्तावित विषययोजना (इ.११वी, १२वी) मधील सुधारित तक्ता-**

| विषय क्र. | विषय प्रकार | | निकष | मूल्यमापन |
|---|---|---|---|---|
| विषय-१ | भाषा | विषय गट-१ | व्यावहारिक मराठी / कार्यात्मक मराठी / सामान्य मराठी | बाह्य परीक्षा |
| विषय-२ | भाषा / वैकल्पिक | विषय गट-१ अ | **भारतीय भाषा-** हिंदी / उर्दू / गुजराती / कन्नड / तमिळ / तेलुगु / मल्याळम / सिंधी / बंगाली / पंजाबी / संस्कृत / पाली / अर्धमागधी / महाराष्ट्री प्राकृत.<br>**परकीय भाषा-** इंग्रजी /फ्रेंच / जर्मन / रशियन / जापनीज / स्पॅनिश / चायनीज / हिब्रु / पर्शियन / अरेबिक. | बाह्य परीक्षा |
| विषय-३ | वैकल्पिक | विषय गट-२ | **कलाशिक्षण :** संगीत, नृत्य, नाट्य, शिल्पकला, रंगकाम, इत्यादी<br>**शारीरिक शिक्षण:** विशिष्ट खेळ, क्रीडा प्रकार, योग, इत्यादी<br>**व्यावसायिक शिक्षण :** NSQF संलग्न विषय, इत्यादी | बाह्य परीक्षा |
| विषय-४ | वैकल्पिक | विषय गट-३ | **सामाजिक शास्त्रे :** राज्यशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, भूगोल, अर्थशास्त्र, मानसशासत्र, लोकप्रशासन, इत्यादी<br>**आंतरविज्ञाशाखीय क्षेत्रे :** वाणिज्य, पर्यावरण शिक्षण विषय, इत्यादी | बाह्य परीक्षा |
| विषय-५ | वैकल्पिक | | | बाह्य परीक्षा |
| विषय-६ | वैकल्पिक | विषय गट-४ | **गणित व संगणनीय विचार :** गणित, प्रोग्रामिंग व कोडींग, व्यावसायिक गणित, इ.<br>**विज्ञान :** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, इत्यादी | बाह्य परीक्षा |
| विषय-७ | ऐच्छिक | | | बाह्य परीक्षा |
| विषय-८ | अनिवार्य (श्रेणी) | विषय गट-५ | पर्यावरण शिक्षण | बाह्य परीक्षा |
| विषय-९ | अनिवार्य (श्रेणी) | विषय गट-६ | शारीरिक शिक्षण व निरामयता | बाह्य परीक्षा |

**४. भाग-क, शालेय विषय, प्रकरण-९ विषययोजना (इ.११वी, १२वी) मुद्दा क्र.९.१० बाबत सुधारणा -**

मुद्दा क्र.९.१० मधील SCF-SE मसुदा पृष्ठ क्र.३४७ ते ३५० मजकूर खालीलप्रमाणे सुधारित करण्यात यावा.

**भाग-क, विषययोजना- मुद्दा क्र. ९.१० मधील सुधारित मजकूर-**

**अ. सर्वसाधारण सूचना- (इ.११वी, १२वी) सर्व माध्यमांसाठी-**

- इ.११वी, १२वी मधील प्रत्येक विद्यार्थ्यास किमान ०८ व कमाल ९ विषय घेता येतील.
- विषय क्र.१ ते ६, ८ व ९ असे आठ विषय निवडणे विद्यार्थ्यास बंधनकारक असेल. तरीही अतिरिक्त १०० गुणांचा विषय विद्यार्थ्यास घ्यावयाचा असल्यास विषय क्र.७ येथील पर्याय उपलब्ध असेल.
- विषय क्र.७ निवडणे विद्यार्थ्यांस ऐच्छिक असेल, तो नाही निवडला तरी चालेल.
- विषय क्र.८ व ९ हे विषय अनिवार्य व श्रेणी स्वरुपातील असतील.
- इ.११वी, १२वी मधील प्रत्येक विद्यार्थ्यास किमान एक व कमाल तीन भाषांचा अभ्यास करता येईल ज्यात, विषय क्र.१ म्हणून मराठी भाषा निवडणे अनिवार्य असेल.

**ब. प्रगत इंग्रजी (ADVANCED ENGLISH) नवीन विषय -**

- IELTS, TOEFL, CPE, PTE, GRE, SAT, GMAT, इत्यादी इंग्रजी भाषा प्राविण्य तपासणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परीक्षांची तयारी सुलभ व्हावी यासाठी त्या पातळीवरील पाठ्यक्रम असलेला प्रगत इंग्रजी (Advanced English) हा नवीन विषय (विषयगट-१ अ मध्ये) उपलब्ध करण्यात येईल.
- प्रगत इंग्रजी विषय निवडल्यानंतर पुन्हा इंग्रजी भाषा हा विषय निवडता येणार नाही.

**क. विद्यार्थ्याने विषयांची निवड करणे -**

स्वत:साठी विषयरचना बनविताना विद्यार्थ्याने खालील प्रक्रियेचा अवलंब करावा.

**I. विषय क्रमांक ३, ४, ५, ६ ची निवड-**

- हे चार विषय, विषयगट २, ३, ४ पैकी किमान दोन गटांमधून निवडणे अनिवार्य राहील.
- हे विषय निवडतांना त्या विषयाचे माध्यम सुद्धा निवडणे आवश्यक राहील.
- विषयगट- २/३/४ मधील वैकल्पिक विषय अधिकाधिक माध्यमांतून घेण्याची सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यमंडळाकडून उपाययोजना करण्यात येईल.

**II. विषय क्रमांक १ ची निवड-**

- विषय क्र.०१ येथे मराठी भाषा विषय निवडणे अनिवार्य राहील.

- इयत्ता ११वी पासून मराठी विषयासाठी तीन पातळ्यांचे पाठ्यक्रम उपलब्ध असतील.
  १. इ.१०वी पर्यंत (१०० गुणांच्या) मराठी भाषेसह शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी १०० गुणांचा **व्यावहारिक मराठी (Professional Marathi)**.
     यामध्ये केवळ ३०टक्के भाग हा पारंपरिक मराठी भाषा विषयाशी संबंधित (भाषिक व साहित्यिक आशय) असेल, उर्वरित भाग हा मराठी भाषेतून विविध व्यावसायिक / व्यावहारिक क्षेत्रांची ओळख करुन देणारा आशय असेल.
     यामुळे इ.१२वी नंतर विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून सदरील अभ्यासक्रमांचा अभ्यास करण्याचा विश्वास प्राप्त होईल.
  २. इ.१०वी पर्यंत (मंडळ परीक्षेमध्ये) मराठी विषयाशिवाय शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी १०० गुणांचा मराठी भाषेचा स्वतंत्र पाठ्यक्रम. **कार्यात्मक मराठी (Functional Marathi)**आणि,
  ३. इतर सर्व विद्यार्थ्यांसाठी १०० गुणांचा मराठी भाषेचा स्वतंत्र पाठ्यक्रम **सामान्य मराठी (General Marathi)** असेल.

### III. विषय क्रमांक २ ची निवड-

- जर विद्यार्थ्याने व्यावसायिक अभ्यासक्रमांची निवड विषय क्र. ३/ ४/ ५/ ६/ ७ मध्ये केली असेल तर त्यास विषय क्र.२ म्हणून एक परकीय भाषा निवडावी लागेल.
- इतर विद्यार्थ्यांना विषय क्र.२ साठी विषयगट- १ अ ते ४ मधून अन्य ठिकाणी न निवडलेला कोणताही विषय निवडता येईल.

### IV. विषय क्रमांक ७ ची निवड-

- विषय क्र.७ साठी विषयगट- १ ते ४ मधून अन्य ठिकाणी न निवडलेला विषय ऐच्छिक स्वरुपात (१०० गुणांसाठी) घेता येईल.
- विषय क्र.७ निवडणे विद्यार्थ्यांस ऐच्छिक असेल, तो नाही निवडला तरी चालेल.

### V. विषय क्रमांक ८ व ९ साठी सूचना-

- विषय क्र.८ व ९ हे विषय अनिवार्य व श्रेणी स्वरुपातील असतील. सदर विषय निवडतांना विकल्प असणार नाहीत.

## ड. इ.११वी, १२वी साठी मूल्यमापनाचे व उत्तीर्णतेचे निकष -

- विषय क्र. १ ते ९ सर्व विषयांचे इ.१२वी चे मूल्यमापन व परीक्षा राज्यमंडळामार्फत घेण्यात येतील. इ.११वी मधील मूल्यमापन शाळा स्तरावर करण्यात येईल. इ.१२वी नंतर अंतिम निकालपत्रक राज्यमंडळ जाहीर करेल.
- गुणपत्रिकेवर विषय क्र. १ ते ७ पैकी सर्वोत्तम ६ विषयांचे गुण BEST SIX एकत्र करुन शेकडा गुण दर्शविण्यात येतील.
- विषय क्र. १ ते ७ येथील सर्व विषय राज्यमंडळाचे निकषांनुसार किमान ३५टक्के गुणांसह उत्तीर्ण करणे आवश्यक असेल.
- विषय क्र. ८ व ९ यांची वार्षिक १०० गुणांची परीक्षा असेल आणि किमान ५० गुणांना उत्तीर्ण समजण्यात येईल.
- विषय क्र. ८ व ९ या विषयांची श्रेणी गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. सदर श्रेणी स्तर विषयाचे गुण, एकूण गुणांमध्ये मिळवले जाणार नाहीत. या विषयासाठी केवळ उत्तीर्णता श्रेणी आवश्यक असेल. परंतु सदर विषयांत किमान ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक असेल अन्यथा विद्यार्थी अनुत्तीर्ण समजण्यात येईल.

## इ. परीक्षा कालावधी मर्यादित ठेवणे व विषय निवडीचे विकल्प यांचे समन्वयासाठी अनुषंगिक बाबी -

- विषय निवडीसाठी खुले विकल्प दिल्यामुळे परीक्षेचा कालावधी लांबेल. त्यासाठी विषयांचे गट अशा पद्धतीने करावेत ज्यामुळे विकल्प राहतील परंतु परीक्षा घेणे सुलभ होईल.
- भाषा विषयांसाठी परीक्षेचे नियोजन खालीलप्रमाणे करता येईल.

  दिवस.१ - मराठी भाषा विषय, (व्यावहारिक मराठी, कार्यात्मक मराठी, सामान्य मराठी)
  दिवस.२ - हिंदी भाषा,
  दिवस.३ - इंग्रजी भाषा विषय (इंग्रजी व प्रगत इंग्रजी)
  दिवस.४ - अन्य भारतीय भाषा,
  दिवस.५ - अन्य परकीय भाषा

  सबब, विद्यार्थ्यांना विषय क्र.२ व ७ साठी भाषा विषय निवडताना परीक्षेचा एकच दिवस दोन भाषांसाठी येणार नाही याची खात्री करावी लागेल.

- वैकल्पिक विषयांसाठीही तार्किक गट तयार करणे आवश्यक असेल. याबाबत राज्यमंडळाने उच्च शिक्षणासाठी आवश्यक विषयांचा अभ्यास करून विषयांचे गट तयार करावेत. अशा आवश्यक विषयांच्या परीक्षा एकाच दिवशी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- यादृष्टीने विषय क्र. २, ३, ४, ५, ६ व ७ साठी वैकल्पिक विषयांचे राज्यमंडळाच्या परीक्षेचे वेळापत्रक ठरविताना मंडळाने ही काळजी घ्यावी की, इयत्ता बारावीनंतरच्या सर्व प्रकारच्या पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र इत्यादी अभ्यासक्रमासाठी असणाऱ्या इयत्ता बारावीतील आवश्यक विषयांच्या अटींची पूर्तता विद्यार्थ्याला करता येईल आणि कोणत्याही इयत्ता बारावीपुढील अभ्यासक्रमासाठी पात्रता म्हणून असणाऱ्या विषयांची परीक्षा एकाच दिवशी असणार नाही. यासाठी मंडळाने इयत्ता अकरावीच्या सुरुवातीलाच दोन वर्षानंतरचे इयत्ता बारावी परीक्षांचे वेळापत्रक वरील काळजी घेऊन जाहीर करावे. ज्यामुळे, विद्यार्थ्यांना सुयोग्य व सोयीचे विषयांची निवड करता येईल

**५. शालेय शिक्षण अभ्यासक्रम / पाठ्यक्रम समिती रचनेस मान्यता देणे.**

राज्य अभ्यासक्रम आराखडा -शालेय शिक्षण तयार झाल्यानंतर, आराखडयामधील विषय योजनेनुसार संबंधित विषयाचा अभ्यासक्रम / पाठयक्रम तयार करण्यासाठी प्रस्तावित अभ्यासक्रम / पाठयक्रम समिती रचना सादर करण्यात आली. त्यामध्ये काही सुधारणांसह पुढीलप्रमाणे शालेय शिक्षण पाठ्यक्रम समितीस मान्यता प्रदान करण्यात आली .

| क्र | पाठ्यक्रम समिती सदस्य तपशील | पद | सामायिक | इ.३-५ | इ.६-८ | इ.९-१० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील अधिकारी | अध्यक्ष | १ | - | - | - |
| २ | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था येथील तज्ज्ञ अधिकारी | सदस्य | - | १ | १ | १ |
| ३ | बालभारती विशेषाधिकारी- १ आणि विषय समिती प्रतिनिधी- ५ | सदस्य | १ | ५ | ५ | ५ |
| ४ | राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) SCF-SE समितीचे प्रतिनिधी | सदस्य | - | १ | १ | १ |
| ५ | पायाभूत स्तर अभ्यासक्रम समितीचे प्रतिनिधी | सदस्य | - | २ | - | - |
| ६ | वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक (संबंधित विषयासाठी) | सदस्य | - | १ | १ | १ |
| ७ | शिक्षक शिक्षण (D.El.Ed./ B.Ed./ M.Ed.) महाविद्यालयातील प्रतिनिधी | सदस्य | - | १ | १ | १ |
| ८ | शिक्षक प्रतिनिधी (५+३+३+४) स्तरनिहाय<br>(१-कनिष्ठ, १-वरिष्ठ व १-स्वत:च्या स्तरातील) | सदस्य | - | ३ | ३ | ३ |
| ९ | स्वीकृत / निमंत्रित / संबंधित विषयातील अनुभवी व्यक्ती. | सदस्य | - | १ | १ | १ |
| | **एकुण** | **४३** | **२** | **१५** | **१३** | **१३** |

प्रत्येक विषयासाठी वरीलप्रमाणे ४३ सदस्यांची मुख्य पाठ्यक्रम समिती असेल. त्याअंतर्गत इ.३री ते ५वी, इ.६वी ते ८वी व इ.९वी व १०वी अशा स्तरनिहाय, विषय निहाय स्वतंत्र समित्या राहतील. अध्यक्ष, विशेषाधिकारी असे काही सदस्य सामायिक असतील. समितीमधील सदस्य निवडीचे अधिकार संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांना राहतील. सर्व समित्या संचालक यांचे नियंत्रणात कामकाज करतील.

**पाठ्यक्रम समितीची कार्ये-**

१. NCERT / CBSE कडून स्वीकारावयाच्या पाठ्यपुस्तकांचे परीक्षण करुन त्याबाबत शिफारस करणे.
२. राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये संबंधित विषयाच्या क्षमता विधानांवरून अध्ययन निष्पत्ती तयार करणे.
३. स्तरनिहाय अभ्यासक्रम व इयत्ता निहाय पाठ्यक्रम तयार करणे.
४. अभ्यासक्रम व पाठ्यक्रमामध्ये पायाभूत स्तर तसेच उच्च शिक्षण स्तर यांचेशी समन्वय ठेवणे.
५. राज्याच्या गरजांचे अनुषंगाने अनुषंगिक शिफारशी करणे.

शेवटी मा. अध्यक्ष यांनी सुकाणू समिती कडून राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) मसुद्यास मान्यता प्रदान करण्यात आल्याचे घोषित केले. त्यानंतर सदस्य सचिव तथा संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी सर्वांचे आभार मानले व सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**पुणे,**
**दिनांक-१९/०९/२०२४**

7P 14/10/24

(राहूल रेखावार)
**सदस्य सचिव, सुकाणू समिती**
तथा, संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे